International Journal of Humanities and Social Science Research
ISSN: 2455-2070; Impact Factor: RJIF 5.22
www.socialsciencejournal.in
Volume 3; Issue 3; March 2017; Page No. 95-96

# भारतीय लोकशाही आणि नागरी समाज

प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव

Degloor College Degloor, Nanded, Degloor, Maharashtra, India

**प्रस्तावना**

जगातील विविध देशात विविध शासनप्रणाली आहेत। या शासनप्रणालींचा उदय व वाटचाल त्या देशातील राजकीय संस्कृती, सांस्कृतिक इतिहास आणि लोकांच्या राजकीय सहभागाच्या प्रमाणावर ठरत असतो। लोकशाही हा एक सर्वोत्तम व आदर्श शासन प्रकार असल्याचे मत अनेक राज्यशास्त्राच्या अभ्यासकांनी व्यक्त केले। तरीही जगातल बऱ्याच देशात लोकशाही शासनव्यवस्था नाही। परंतु अलिकडील काळात अनेक देशात उदा : अफगाणिस्तान, नेपाळ, ब्रम्हदेशमध्ये लोकशाही शासनाची स्थापना होत आहे। माहिती तंत्रज्ञान, नागरी समाज, अराज्यीय घटकांचा वाढता प्रभाव, लोकशाही शासनाविषयी सर्वसामान्य जनतेचा वाढता विश्वास, आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर लोकशाही देशांचे जनतेचा वाढता विश्वास आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर लोकशाही देशांचे वाढते महत्व इत्यादी कारणांमुळे अनेक देश लोकशाहीकडे इच्छुक आहेत। भारत जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे। भारतीय लोकशाही प्राचीन भारतीय लोकशाही परंपरा आणि पाश्चिमात्य आधुनिक लोकशाहीचा समन्वय आहे। आधुनिक लोकशाही पाश्चात्य राष्ट्राने जगाला दिलेली देणगी आहे। असे सामाजिक शास्त्रात विशेषतः राज्यशास्त्रात शिकवले जाते। परंतु त्याही पूर्वी भारतात महात्मा गौतम बुध्दांच्या विहारात आणि महात्मा बसवेश्वरांच्या कल्याण नगरी व अनुभवमंटपात लोकशाही परंपरा मूरल्या होत्या। तसेच प्राचीन भारतीय राज्यशास्त्र व अर्थशास्त्राचा जनक कौटिल्यांच्या अर्थशास्त्र ग्रंथात लोकशाहीची बीजे आहेत। राजाचे प्रत्येक कार्य न्यायसंगत असावे असा उल्लेख कौटिल्याच्या अर्थशास्त्रात आहे। परंतू तद्नंतरच्या काळात अनेक कारणांमुळे लोकशाही व्यवस्था व मूल्य म्हणून विकसित झाली नाही। अशा प्रकारे प्राचीन भारतात लोकशाहीचे बीज स्पष्टपणे दिसूनही वर्तमान भारतीय लोकशाही बऱ्याच प्रमाणात पश्चिमेची देणगी समजले जाते। कदाचीत भारताच्या गौरवशाली लोकशाही वारशाचा प्रचार व प्रसार करण्यात भारतीयांना आलेले अपयश यास कारणीभुत असावे। तरीही भारतात आधुनिक लोकशाहीची पाळेमुळे खोलपर्यंत पोहोचली नाहीत। तरीही लोकशाही हळुवारपणे आपली पाळेमुळे मजबूत करत आहेत। भारतात लोकशाहीला मजबुत करण्यात प्रसार माध्यमे, भारतीय जनता, दबाव गट, नव सामाजिक चळवळी आणि अराज्यीय घटकांचा वाटा महत्वाचा आहे। यांतील एक अराज्यीय घटक म्हणजे नागरी समाज होय।

प्रस्तूत लेख भारतीय लोकशाही व नागरि समाज यातील आंतरसंबंध शोधण्याच्या हेतूने लिहिण्यात आला। तसेच भारताच्या राजकारणात शितयुदोत्तर काळातील नागरी समाजाचे वाढते महत्व अधारेखित करण्यात आले। प्रस्तुत विषयावर मांडणी करताना ऐतिहासिक अभ्यास पध्दतीसह वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पध्दतींचा आधार घेण्यात आला। ज्यामुळे भारतीय लोकशाही व नागरी समाजातील आंतरसंबंध, परस्परविरोधाभास स्पष्ट करणे सहज शक्य झाले। कोणत्याही विषयाचा अभ्यास करण्यासाठी कांही आधार घ्यावा लागतो। अगदी त्याचप्रमाणे प्रस्तुत विषयांवरील विश्लेषण करताना दुय्यम साधनसामुग्री म्हणजेच नियतकालिके, वर्तमानपत्र, संदर्भग्रंथाचा आधार घेण्यात आला।

नागरी समाज हा शब्द भारतात प्रामुख्याने अण्णा हजारे, अरविंद केजरीवाल, किरण बेदी व प्रशांत भूषण यांच्या लोकपाल आंदोलनापासून अधिक चर्चिला जाणारा परवलीचा शब्द बनला आहे। नागरी समाज ही एक व्यापक संकल्पना आहे। ज्यात अनेक घटक, तत्व व मुद्यांचा समावेश होतो। नागरी समाज या संकल्पनेला लोकशाहीप्रमाणेच प्रदीर्घ इतिहास आहे। काळाच्या वेगवेगळ्या टप्यांवर या नागरी समाजाच्या अर्थात व स्वरुपात बदल झाला। परंतु वर्तमानात भारतीय लोकशाहीला प्रभावित केलेल्या अनेक घटनांपैकी नागरि समाज हा एक घटक आहे। त्यामुळे प्रस्तुत लेखात भारतीय लोकशाहीचे नागरि समाजाशी असलेले नातेसंबंध शोधण्याचा प्रयत्न केला।

नागरी समाज पारदर्शक शासन, विकास, जीवन जगण्याच्या स्तरात सुधारणा, पर्यावरण, लिंगभेद, मानवी हक्क, सर्वांचा सहभाग यास प्राधान्य देतो। शासनाची कार्यपध्दती माहिती तंत्रज्ञानाच्या साह्याने सर्वलोकांपर्यंत पोहचवून समविचारी लोकांचा एक गट तयार करुन शासनावर दबाव टाकतो। या दबावाची परिणीती लोकल्याणाशी संबंधित विषयाला शासन व प्रशासनात प्राधान्य देण्यात होते। यामुळेच नागरी समाज वर्तमान लोकशाहीची निकड बनली आहे। लोकशाही जाणीवांनी परिपक्व असलेला एक समुह नागरी समाजात असतो।

नागरी समाजाच्या प्रारंभ व उदय आदिम समाजातील समाज व नगररचेनपासूनचा आहे। नागरी समाज सार्वजनिक हिताला व्यक्तिगत हितापेक्षा अधिक महत्वपूर्ण मानतो। रुसोच्या सामुहिक ईहा संकल्पनेत देखील अशीच मांडणी करण्यात आली। नागरी समाज आदिम समाजाचे विकसित रुप आहे। नागरी समाज राज्य आणि शासनाचा आधार आहे। समाजाचा विकास ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे। ज्यात अनेक घटक व तत्वांचे सहकार्य मिळते। विकासाच्या प्रक्रियेत सातत्याने नवनवीन प्रथा व श्रृंखला जुडत जातात तर जुन्या श्रृखंला मागे पडतात। सभ्यतेच्या विकासासोबत नागरी समाजाचे स्वरुप अधिक स्पष्ट व निश्चित होते। लोकशाहीत जनहितासाठी शासन-प्रशासन आणि नागरी समाजात सहकार्यपूर्ण संबंध महत्वाचे आहेत। ते दोन्ही परस्पर आश्रित आहेत। एकमेकांना प्रभावित करतात। एकमेकांचे स्वरुप निर्धारित करतात।

राजेशाहीत शासनासंबंधीच्या सर्व सत्ता व अधिकार केंद्रीत असतात। त्यामुळे समता व मानवी मूल्यांचा अभाव असतो। सरंजामशाहीत शासनाचे सर्व अधिकार व सत्ता एकापेक्षा अधिक व्यक्तित निहित असतात। ज्यामुळे समाजात बऱ्याच प्रमाणात समता जाणवते। लोकशाहीत पारदर्शकता व समता परमोच्च बिंदूवर असते। कारण या शासनात सर्वांचा सहभाग असतो। शासन आणि नागरी समाजाच्या संयोगातून राजकीय संस्कृतीचा उदय होतो। सामान्य संस्कृति आणि राजकीय संस्कृतित घनिष्ट संबंध असतात। दोन्ही परस्परांना प्रभावित करतात। सामान्य संस्कृति राजकीय संस्कृतिपेक्षा अधिक व्यापक असते। राजकीय संस्कृती सामान्य संस्कृतिचा एक भाग आहे। परंतू अधिक काळापासून ते परस्परांशी संबंधित आहेत। त्यामुळे त्यांना पूर्णतः वेगवेगळे करता येणे शक्य नाही। शासन व्यवस्थेसाठी राजकीय संस्कृती अधिक महत्वाची असते। राजकीय संस्कृतीत असलेल्या वेगळेपणामुळेच एकच शासनव्यवस्था वेगवेगळया देशात वेगवेगळया पध्दतीने संचलित होते। तिच्या यश-अपयशाचे परिणाम ही वेगवेगळे असतात। उदा : भारत आणि पाकिस्तान, समाज व्यवस्था, अर्थव्यवस्था, धर्मव्यवस्था, इतिहास, भूगोल, रुढी-परंपरा, नियम, कायदे, शिक्षण व्यवस्था, विचारसरणी, इत्यादींच्या एकत्रीकरणातून राजकीय संस्कृती निर्माण होते। सैध्दांतिकदृष्ट्या राज्यघटना राजकीय संस्कृतिचे केंद्र असते। परंतु व्यवहारात अनेक घटक त्यास प्रभावित करतात।

भारतात स्वातंत्र्यानंतर लवकरच एक समृध्द, व्यापक व बहुअर्थी राज्यघटनेची निर्मिती करण्यात आली। परंतु आपल्यासोबत स्वतंत्र झालेल्या बऱ्याच राष्ट्रात असे झाले नाही। भारतात डॉ. पंडित नेहरु, इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी,

डॉ. मनमोहन सिंग व नरेंद्र मोदींसारखे अतिशय प्रभावशाली नेतृत्व उदयास आले। भारतात नियमितपजे मतदार याद्या बनवु-न लोज शाही मार्जा-ने निवडणुका झाल्या। भारतीय शासनाने शिक्षणाचा प्रसार-प्रसार आणि कुटूंब नियोजनासाठी सातत्याने प्रयत्न चालवले। भारतात सर्वधर्मांना समा-न महत्व आहे। हिंदी भाषेसोबत इतर भाषांच्या विकासावर भर दिला जातो। परंतु भारतात स्वातंत्र्यानंतर जमीनदारी प्रथा नष्ट करण्यात आली। भारतीय शासन व प्रशासनात सैन्यांची भूमिका नगण्य असते। या देशात केव्हावी सैनिज शास-न आले -नाही। भारतात न्यायालयीन व्यवस्थेला सन्मानाचे स्थान आहे। भारतात जर एखाद्या शास-ना-ने चुकीचे कार्य केले जे राज्यघटनेच्या नियमाबाहेर आहे, त्यास दंडित केले जाते।

लोकशाहीत नागरी समाज सार्वभौम असतो। राजकीय सार्वभौमाचा निवास -नाजरी समाजातच असतो। -नाजरी समाज निवडणुकीच्या साह्याने शासनाचे गठन आणि संचलनासाठी लोकप्रतिनिधींना अधिकृत करतो। शासनात कायद्याचे सार्वभौमत्व विहित असते। आधुनिक भारतात प्रथमच १८९२ च्या भारतीय परिषद अधिनियमाला लोकशाहीची बीजे स्पष्टपणे जाणवतात। या अधिनियमाने भारतीयांना निवडणुकीच्या सिध्दांताची ओळख करुन दिली। जरी तो अप्रत्यक्ष आणि मर्यादीत असला तरी १९०९ च्या भारतीय परिषद कायद्याद्वारे निर्वाचित सदस्यांच्या संख्येत अधिक वाढ करण्यात आली। भारतीयांना मर्यादीत प्रमाणात मतदानाचा अधिकार प्राप्त झाला। १९१९ च्या भारतीय शासन अधिनियमाद्वारे प्रातांतही मर्यादीत स्वरुपात जबाबदार शासनाची व्यवस्था करण्यात आली। जवळपास देशातील १०% लोकांना मतदानाचा अधिकार मिळाला। १९३५ च्या भारतीय शासन अधिनियमाद्वारे प्रांतात स्वायत्त व उत्तरदायी मंत्रिमंडळांची व्यवस्था करण्यात आली। १९४७ च्या भारतीय स्वातंत्र्य अधिनियमाद्वारे भारतास पूर्णतः स्वतंत्र व लोकशाही राष्ट्र ब-नवले। भारताचा एक भाग १४ ऑगस्ट १९४७ ला स्वतंत्र राष्ट्राच्या रुपात वेजळा झाला। उर्वरित भारताने १५ ऑगस्ट १९४७ ला आपला पहिला स्वातंत्र्य दिवस साजरा केला। या स्वतंत्र भारताची राज्यघटना निर्माण करण्यासाठी १९४७ ला मतदान घेवून राज्यघटना समितीचे गठन करावे लागले। घटना समिती राज्यघटनेचे निर्माण करण्यासोबतच भारताची संसद म्हणून कार्य करत होती। -नवी-न राज्यघटनेनूसार १९५२ ला पहिल्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या। ज्यात सर्वांनाच प्रौढ मतदानाचा अधिकार देण्यात आला। तद्नंतर अतिशय हळुवारपणे भारतीय लोकशाहीचा विकास झाला। वर्तमान लोकशाहीच्या युगात -नाजरी समाज या संकल्पनेत कोणाचा समावेश करावा याबाबत दोन मतप्रवाह आहेत। मर्यादित दृष्ट्या विचार केला तर सामाजिक जीवनाच्या विभिन्न भागात अग्रेसर राहणाऱ्या लोकांनाच नागरि समाजात समाविष्ट करावे। परंतू व्यापक दृष्टिकोणानुसार लोकशाहीत सार्वजनिक प्रौढ मताधिकाराची व्यवस्था असते। त्यामुळे नागरीसमाजाची निर्मिती सर्व लोकांना मिळूनच होते। फार पूर्वी मोजकेच लोक शासनाशी संबंधित होते। त्यांनाच नागरिक म्हणत व इतरांना प्रजा म्हटले जाते। ॲरिस्टॉटल-ने राजकीय जीवनात सक्रि य असणाऱ्या व्यक्तिंना महत्व दिले। म्हणजेच न्याय, कायदा, निर्मिती या संबंधित कार्यात सहभागी होणारेच नागरिक असतात। सार्वभौमत्वाच्या संकल्पनेचा अभ्यासक जॉन बोदां-च्या मते नागरिक आणि प्रजा यां-ना वेजवेजळे संबोधले, त्यांच्या मते सार्वभौमत्व नागरिक व प्रजा यांच्यापेक्षा श्रेष्ठ शक्ती आहे ज्यावर राज्यांचा काहीच अंकुश राहत नाही।

परंतु २१ व्या शतकातील परिस्थिती वेगळी आहे। बहुतांश लोकांचे शिक्षणाचे आणि राजकीय जाणीवेचे प्रमाण वाढले। त्यामुळे आज नागरी समाजाचा अर्थ संपूर्ण जनता आहे। त्यामुळे आज आमचा समाज नागरी समाजाच्या अवस्थेपासून पुढे जावून सभ्य समाज बनण्याच्या मार्गावर अग्रेसर आहे। भारतात आजपर्यंत अतिशय सहजपणे सत्ता परिवर्तन झाले। नेहमीच न्यायालयाच्या निर्णयाचा सन्मान केला जातो। भारतीय समाज सभ्य समाज बनण्याच्या प्रक्रियेत आहे। ती एक प्रक्रिया असल्यामुळे प्रदिर्घ काळ चालते। सभ्य समाज लोकशाहीचे संरक्षण, विकास आणि विस्तार करण्यात अधिक सक्षम असतो। सभ्य समाजास आदर्श लोकशाहीची पूर्वअट मानतात। सभ्य समाज आदर्श लोकशाहीचे लायसेंस आहे। ज्या समाजातील अधिकांश लोक आत्मकेंद्रीत असतात, त्यास सभ्य समाज म्हणता येणार नाही। या सभ्य समाजाचे प्रतिक नैसर्गिक व मानवनिर्मित संकटकाळात जाणवते। उदा : भुकंप, दहशतवादी हल्ला, अतिवृष्टी ई. सभ्य समाजाचे सक्रिय होणे अनिवार्य आहे। सभ्य समाजामार्फतच शासनाचे स्वरुप व कार्यकारणाचे निर्धारण व्हावे। सभ्य समाजास शासन चांगले आहे किंवा नाही हे ठरवण्याचा अधिकार असावा। सभ्य समाजाने शासनाचे नियंत्रक आणि मार्गदर्शकाच्या भूमिकेत असावे। सभ्य समाज राज्याच्या चूका दुरुस्त करते। शासन प्रशासनास स्वतःच्या जबाबदाऱ्यांची जाणीव करुन देते। त्यांना सर्वाधिकारवादी होण्यापासून रोकते। तसेच सर्वांच्या हित व कल्याणासाठी कार्य करण्याची प्रेरित करते। ती शासनाची प्राथमिकता ठरवते। ते महत्वाच्या पदावर योग्य व्यक्तिची निवड करावी यासाठी शासनावर दबाव टाकते।

जवळपास जगातील सर्वच विकसित राज्यात सभ्य समाज आपली भूमिका प्रभावीपणे बजावते। परंतु भारतात शिकलेले लोक राजकारणाप्रती उदासीन आहेत। यामुळे राजकारणात अकार्यक्षम व अपात्र लोकांचे वर्चस्व स्थापन होत आहे। जे लोकशाहीला व्यवस्थित संचलित होवू देत नाहीत। नैतिक व मानवी मूल्यांच्या संरक्षण व संवर्धनासाठी प्रयत्न करावे लागतील। मागास व आदिवासी समाज धार्मिक नियमांचे पालन करतो तर विकसित समाज न्याय आणि नैतिकतेच्या आधाराने जगतो।

भारतीय लोकशाहीत अनेक दोष आहेत। परंतु त्यास काही तात्काळ पर्याय नाहीत। त्यात अधिकाधिक सुधारणा करणे हेच आमच्या हातात आहे। ते बदल्या काळानुसार होत आहे। वाढता आर्थिक भ्रष्टाचार, लोकसंख्येतील वाढ आणि अधिक वेतन देवून कमी लोकांना शासकीय नौकरीत ठेवणे। या भारतीय लोकशाही समोरील तीन प्रमुख समस्या आहेत। भारतातील आर्थिक भ्रष्टाचार रोखण्यासाठी लोककल्याजकारी योजनांना बंद करुन त्यावर होणारा खर्च भारतातील सर्व कुटूंबांना बँकेच्या माध्यमातून दरमहा दोन हजार रुपये प्रमाणे द्यावा। जास्तीत जास्त दोन मूलांचा सिध्दांत स्विकारुन त्यांचे पालन करावे। अधिकाधिक लोकांना नौकऱ्या द्याव्यात। भारतात लोकशाही आणि नागरी समाज दोन्ही विकासाच्या वाटेवर आहेत। त्यांना यशस्वी करण्यासाठी आम्हास अधिक प्रयत्न करावे लागतील। शासकीय वर्ग आणि सर्वसामान्य जनता यां-ना मिळणाऱ्या सुविधात अधिक अंतर असू नये। शासक वर्गाला अधिकाधिक जबाबदार व कर्तव्यदक्ष बनवावे लागेल। शासक वर्ग जो स्वतःला इतर जनतेपासून वेगळा समजतो यापासून सत्ताधाऱ्यांना मुक्त करावे लाजेल। सभ्य समाजाच्या सक्रियतेवर लोकशाहीचे संचलन व यश अवलंबून आहे। आत्मनिर्भर, अभ्यासू, निःस्वार्थी, कार्यक्षम, इच्छाशक्ती संपन्न व प्रामाजिज लोकांनी पुढाकार घेवून शासन-प्रशासन चालवण्यात सक्रिय व्हावे तरच देश, समाज, व्यक्ति संवेदनशील व मानवीय बनेल। ज्याची अपेक्षा या देशातील महापुरुषां-नी विविध ज ाळात केली। तो काळ व त्यांच्या स्वप्नातील सभ्य व -नाजरी समाजाच्या स्थापनेची त्यांचे वारस म्हणून आपली जबाबदारी आहे। आपण या जबाबदारीस प्रामाणिकपणे यशस्वी करण्याच्या प्रक्रियेचा सर्वजण भाग बनू तरच नागरी समाजाचा लोकशाहीतील वाटा अधिक वृध्दींगत होईल।

संदर्भ ग्रंथ :


१) राजनीति विज्ञा-न-डॉ.पुखराज जैन-साहित्य भवन पब्लिकेशन्स, आगरा।
२) आधुनिक राजनितिक सिध्दांत-डॉ.पुखराज जैन, एवं डॉ.बी.एल.फाडिया-साहित्यभवन पब्लिकेशन्स, आगरा।
३) आधुनिकता उत्तर-आधुनिकता एवं नव समाजशास्त्रीय सिध्दांत-एस.एल.दोषी।
४) **Democratic Politics-II-NCERT.**
५) **Social and political life-II-NCERT.**
६) भारतीय राजनीति विज्ञा-न शोधपत्रिज ा-अगस्त-दिसंबर-२०१३।
७) राजनीति सिध्दांत की रुपरेखा-ओ.पी.गाबा।
८) विचारशलाज ा-एप्रिल ते डिसेंबर-२०१६-संपादज -डॉ.नागोराव कुंभार।
९) **२१st century world : Present Scenario & Challenges Editor-Dr.Pandit Nalawade.**
१०) लोकशाहीचे व्याकरण-अनुवाद-शारदा साठे-न्या.पी.बी.सावंत।